बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
**प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5**
**टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495**

# वृत्तपत्रीय निवेदन

## **श्री हृषीकेश अरविंद मोडक यांची बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून नियुक्ती**

**पुणे दिनांक १४ मे २०२१** : भारत सरकारने आपल्या दिनांक १३ मे २०२१ रोजीच्या अधिसूचना क्रमांक एफ क्रमांक ६ / ३ / २०१२ / बँक व्यवहार . १ ( खंड २ ) अन्वये श्री हृषीकेश अरविंद मोडक यांची दिनांक १३ मे २०२१ पासून भारत सरकारचे नामनिर्देशित संचालक म्हणून बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळावर नियुक्ती केली आहे.

श्री हृषीकेश अरविंद मोडक हे मणिपूर संवर्गाचे भारतीय प्रशाकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न फर्ग्युसन महाविद्यालयातून अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या वित्त सेवा विभागात उपसचिव म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी श्री मोडक यांनी महाराष्ट्र राज्यातील वाशीम येथे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी म्हणून काम केले आहे. त्यांनी विक्रीकर आयुक्त व मणिपूर राज्यातील उखरूळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी म्हणून सुद्धा काम केले आहे. .

दिनांक १३ मे २०२१ पासून त्यांची भारत सरकारचे नामनिर्देशित संचालक म्हणून बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे.